Vol 6 Issue 10 April 2017

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

ISSN: 2231-5063 IMPACT FACTOR : 4.6052(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 10 | APRIL - 2017

GRT GOLDEN RESEARCH THOUGHTS

# 1980 नंतरची मराठी ग्रामीण कादंबरी

प्रा. प्रवीण ताटे देशमुख
मराठी विभाग, मु. सा. काकडे महाविद्यालय, सोमेष्वरनगर, ता. बारामती.

## प्रस्तावना




भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. भारतातील 70 टक्के लोकांचा व्यवसाय शेती किंवा शेतीवर अवलंबून असणारे उद्योग हाच आहे. ग्रामीण भागातील खेडे पूर्णतः शेतीवर अवलंबून आहे. शेती हा प्रमुख व्यवसाय तेथे उपलब्ध असतो. शेतीमध्ये काम करून आपला उदरनिर्वाह करणे हाच दिनक्रम तेथील बहुतेक लोकांचा असतो. म्हणूनच आपल्या कृषीप्रधान देशात बहुतेक सण, उत्सव हे कृषी व्यवस्थेशी निगडित असतात. म्हणूनच आपल्या कृषीप्रधान देशात पण ही परिस्थिती पुढील काळात बदलली. ज्या खेड्याचा पूर्वी गौरव होत असे, तीच खेडी आता अंतर्विरोधाचे केंद्र बनली. खेड्यातील माणसांचे प्रश्न तीव्र झाले. शेती व्यवसाय हा दिवाळखोरीचा बनला आहे. विशेषतः कोरडवाहू शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचे जीवन असह्य व अगतिक झालेले दिसते. लहान शेतकरी, शेतमजूर जीवनाला कंटाळून आत्महत्या करताना दिसतात. त्यामुळे कधीकाळी वैभवसंपन्न असणारी खेडी आता उध्वस्त होताना दिसत आहेत. औद्योगिकीकरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था मोडकळीस आली आहे. बदलांच्या रेट्यात ग्रामीण माणूस होरपळून निघत आहे. वेगाने वाढणारे औद्योगिकीकरण, लहरी निसर्ग, शहरात वाढणाऱ्या रोजगाराच्या संधी व त्यामुळे शहराकडे धावणारा तरूण वर्ग, रक्त आटेपर्यंत कष्ट करूनही हाती काहीही न लागल्यामुळे अस्वस्थ झालेला शेतकरी वर्ग, शेतीकडे उदास नजरेने पाहू लागला. हरितक्रांतीमुळे बियाण्यांच्या नवनवीन जाती बाजारात आल्या आहेत. त्यामुळे कधी सुकाळ आलाच तर प्रचंड उत्पादन होऊन शेतमालाच्या किंमती घसरत आहेत. व्यापारी व दलाल पिळवणूक करीत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी व शेतीवर अवलंबून असणारे गावगाड्यातील मजूर देशोधडीला लागले. अशा या बदलत्या खेड्याचे, ग्रामीण माणसाच्या जीवनाचे व हतबल बनलेल्या ग्रामीण वास्तवाचे चित्रण इ. स. 1980 नंतरच्या ग्रामीण कादंबरीतून येते.

इ. स. 1980 नंतरच्या ग्रामीण कादंबरीविषयी डॉ. नानासाहेब सूर्यवंशी म्हणतात, ''1980 नंतर महाराष्ट्रात दुष्काळ पडला. या दुष्काळाचे स्वरूप भयंकर होते. याची झळ ग्रामीण तरूणाला भोगावी लागली. या तरूण पिढीतील काही तरूण उच्च शिक्षण घेऊन बाहेर पडले होते, तर काही जण उच्च शिक्षण घेत होते. शिक्षणाचे पंख लावून, नव्या आशा घेऊन भरारी मारायच्या ऐन मोक्यातच दुष्काळी स्थिती पडल्याने तो आपल्या कुटुंबाची, गावाची, शेतीची चाललेली होरपळ पाहून खचून गेला. यातून त्याची एक वेगळी मानसिकता घडत गेली. दुष्काळ हे बाह्य स्थित्यंतर होते, पण त्याचा शेतीवर, शेतकऱ्यांवर, शेतकऱ्यांच्या जनावरांवर, खेड्यावर आणि पर्यायाने ग्रामीण जीवनावर मूलगामी परिणाम झाला. पुढे दुष्काळ हटला, पण त्याचा परिणाम म्हणून जी मानसिकता तयार झाली ती अधिकच बळकट बनत गेली. शेती व्यवसाय किफायतशीर झाला तरी तो परवडणार नाही; जर शेती पिकत नसेल तर ती विकून दुसरा धंदा बघावा अशी मानसिकता बनत गेली. ग्रामीण कुटुंबातील तरूण वर्गाला नोकरी ही चरितार्थासाठी महत्त्वाची वाटू लागली. त्यासाठी तो शेती विकू लागला. 1980 नंतर शेतकरी कुटुंब केवळ शेतीवर तग धरेनासे झाले. शेतीला पूरक जोडधंद्याची गरज भासू लागली. निव्वळ शेतीतून कुटुंबातील सर्वांना पुरेसे धान्य मिळेना किंवा गरजा भागवू शकेना. म्हणून शेतकऱ्याला शेतीविषयी प्रेम राहिले नाही. शेतीकाम म्हणजे घाण काम अशी वृत्ती तयार होत गेली. सुटा–बुटातील नोकरी, शहराचे नवे आकर्षण अशा अनेक बाजूंनी ही एक विचित्र मानसिकता निर्माण होत आहे. अशा बदलत्या ग्रामीण मानसिकतेचे चित्रण कादंबऱ्यांतून येऊ लागले.''[1] हे विवेचन 1980 नंतरच्या ग्रामीण भागाचे व शेती व्यवसायाशी संबंधीत माणसांचे नेमके विश्लेषण करते. त्यातून इ.स. 1980 नंतरच्या ग्रामीण कादंबरीचे आशयविश्व काय आहे याची जाणीव होते.

ग्रामीण साहित्याची केंद्रवर्ती जाणीव म्हणजे शेतकऱ्यांचे दुःख, त्यांचे शोषण व शोषक व्यवस्थेचे रूप उघड करणे, गेल्या तीन दशकांपासून ग्रामीण कृषी व्यवस्थेची पडझड होत आहे. चोहोबाजूंनी ग्रामीण माणसांचे शोषण होत आहे. शेतीवरील अस्मानी–सुलतानी संकटे, शेतीमालाचे घसरणारे भाव, वाढता उत्पादन खर्च, बॅंकांची वित्तपुरवठ्याबाबत अनास्था, सरकारी नोकरशाहीची लाचखोर मग्रुर वृत्ती, सावकारशाहीचा पाश, भयानक दारिद्र्य, शेतकऱ्यांच्या आत्महत्या अशा बहुविध आशयसूत्र व्यक्त करणाऱ्या कादंबऱ्या या कालखंडात प्रकाशित झाल्या. यात बाबाराव मुसळे यांची 'हाल्या हाल्या दुधू दे', वारूळ', शेषराव मोहिते यांची 'गणगोत', 'भिरूड', भारत काळे यांची 'ऐसे कुणबी भूपाळ', सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास', 'तहान', तानाजी राऊ पाटील यांच्या 'रूपसावली', 'आभाळ', भीमराव वाघचौरे यांच्या 'रानखळगी', 'गराडा', रवींद्र शोभणे यांची 'कोंडी' इत्यादी कादंबऱ्यांचा उल्लेख आवर्जुन करावा लागतो.

1980 नंतरच्या कालखंडात खेड्यापर्यंत शिक्षणाचा प्रसार झपाट्याने झाला. तालुक्याच्या ठिकाणी महाविद्यालये निघाली. शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेऊ लागली. येथील शिक्षणसंस्था राजकीय अड्डे झाले. शिक्षणक्षेत्रात अफाट भ्रष्टाचार सुरू झाला. ग्रामीण भागातला तरूण शिकला, पण त्याला

नोकरी नाही आणि शेतीही करता येत नाही अशा परिस्थितीत सापडला. शिक्षणाबरोबरच ग्रामीण भागात झपाट्याने राजकारण पोहोचले. त्यामुळे राजकीय पुढाऱ्यांमधील सत्तासंघर्ष गावागावात पोहोचला. राजकारण्यांबरोबरच, भ्रष्टाचार, गटातटाचे राजकारण, राजकीय हेतून प्रेरित होऊन जातीपातींना दिलेले भगवे, हिरवे, निळे संदर्भ खेड्यापर्यंत पोहोचले. या संदर्भांनी ग्रामीण भागातील सर्वच घटकांना प्रभावित केले. एकूण लोकशाहीत सामान्यांचा कसा भ्रमनिरास झाला याचे चित्रण पुरूषोत्तम बोरकर यांच्या 'मेड इन इंडिया', बा.ग. केसकर यांच्या 'वायटूळ', राजन गवस यांच्या 'धिंगाणा', नागनाथ कोत्तापल्ले यांच्या 'गांधारीचे डोळे', रंगनाथ पठारे यांच्या 'ताम्रपट', रा. रं. बोराडे यांच्या 'आमदार सौभाग्यवती' इत्यादी कादंबऱ्यातून आले आहे.

1980 नंतरच्या कालखंडातील ग्रामीण कादंबरीकार हे नव्या जाणवांनी लेखन करू लागले. ही कादंबरी वास्तवाभिमुख झाली. हे कादंबरीकार वास्तवाचे प्रकटन करू लागले. वास्तवाच्या पाठीमागे असणाऱ्या बाबींचा शोध घेऊ लागले. याविषयी डॉ. नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, ''स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण भागात जे परिवर्तन झाले होते, ते 1980 च्या असपास अधिक तीव्र झाले. तणाव अधिकच वाढले आणि ग्रामीण लेखक 'शोधक' झाला. त्यांच्या कादंबरी लेखनातून अनेक नवनवे चित्रणविषय झाले. या निमित्ताने वास्तव प्रकटनाची व्याप्ती वाढली; पण या कालखंडातील सगळ्यात महत्त्वाची जर कोणती गोष्ट असेल तर ती ही की, अमुक एक वास्तव आकाराला येण्याचे कारण कोणते याचा शोध लेखक घेऊ लागले.''[2] याचा परिणाम म्हणून आतापर्यंत जे विषय कादंबरीतून चित्रित झाले नव्हते त्या विषयांवर कादंबरी लेखन होऊ लागले. नव्या जाणिवेची कादंबरी निर्माण होऊ लागली. समकालीन प्रश्नांना कादंबरी अभिव्यक्त करू लागली. ग्रामीण कादंबरीतील जाणिवांचे विविधांगी स्वरूप पाहताना धर्माच्या नावाखाली ग्रामीण प्रथा–परंपरामधून सामान्य लोकांचे कसे शोषण होते याचे चित्रण राजन गवस यांच्या 'भंडारोग', 'चौंडकं' या कादंबऱ्यातून येते. ग्रामीण भागातील दलित–सवर्ण संघर्ष 'तणकट' मधून येतो. ग्रामीण भागातील दलित सवर्ण संघर्ष संपवायचा असेल तर परस्परांना समजून घेण्याची निकड येथे राजन गवस व्यक्त करतात. स्वातंत्र्योत्तर काळात नियोजन व विकास हे परवलीचे शब्द झाले. परंतु हा विकास कोणाचा? व कोणाच्या जीवावर? हा कळीचा प्रश्न बनला आहे. विकासाच्या नावाखाली सामान्य शेतकऱ्यांच्या जमिनी काढून घेऊन तेथील विस्थापितांना वाऱ्यावर सोडून देणाऱ्या व्यवस्थेच्या अंतरंगाचा उभा–आडवा छेद विश्वास पाटील यांची 'झाडाझडती', त्र्यंबक आसडोहकर यांच्या 'काळी आई', मोहन पाटील यांची 'बस्तान' व शकर सखाराम यांची 'इस. ई. झेड' यांसारख्या कादंबऱ्यांतून धेतला आहे. ग्रामीण महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा कायापालट करणाऱ्या सहकार चळवळीतील भ्रष्टाचाराचे, अपप्रवृत्तीचे, हितसंबंधी राजकारणाचे दर्शन वासुदेव मुलाटे यांनी 'विषवृक्षाच्या मुळ्या' मधून घडविले आहे. समकालीन काळातील आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे 'पाणी' प्रश्न होय. पाणी आणि त्याच्याशी निगडित प्रश्न ग्रामीण कादंबऱ्यातून आले आहेत. विश्वास पाटील यांची 'पांगिरा', बाबाराव मुसळे यांची 'पखाल', सदानंद देशमुख यांची 'तहान', रा. रं. बोराडे यांची 'चारापाणी' इत्यादी कादंबऱ्यांतून पाण्याच्या अनुषंगाने येणाऱ्या प्रश्नांची चर्चा केली आहे. अशा पद्धतीने इ.स. 1980 नंतरची कादंबरी वास्तवाभिमुख तर झालीच, पण ग्रामीण भागातील विविधांगी विषय तिने चित्रणासाठी निवडले. त्यामुळे ग्रामीण कादंबरीच्या कक्षा रूंदावल्या हे सत्य आपणास मान्यच करावे लागते.

इ.स. 1980 नंतरच्या ग्रामीण कादंबरीविषयी डॉ. गणेश मोहिते लिहितात, ''1980 नंतरची ग्रामीण कादंबरी शोधक दृष्टीने समकालीन वास्तवाला भिडताना दिसते. वास्तवाच्या व्यामिश्रतेची उकल काळाच्या विविध संदर्भासह लेखक व्यक्त करताना दिसतात. या कालखंडातील कादंबरीने एकूणच मराठी कादंबरीला समूहनिष्ठतेकडे वळविले व जनसमूहांचे जगण्या–मरण्याचे प्रश्न केंद्रस्थानी आणले. पूर्वीच्या ग्रामीण कादंबरीतरील रोमॅन्टिसिझमचा शिक्का पुसून सामाजिकता व वास्तव केंद्रिततेचे प्रखर भान दिले. वंचित, शोषित घटकांचे शोषणाचे विविध पदर उलगडून दाखविले. समकालीन राजकारण, अर्थकारण, धर्मकारणाची बदलती रूपे व ग्रामीण समुहावरील त्याच्या परिणामास भाषिक कृतीतून उभे केले.''[3] हे मत रास्त आहे. ग्रामीण कादंबरी शोषणाचा तीव्र निषेध व्यक्त करते. प्रसंगी विद्रोहही आपणास दिसतो. खाजगीकरण, जागतिकीकरण या धोरणांचा प्रभाव ग्रामीण जीवनावर पडला आहे. शेती व्यावसायात अनेक प्रश्न व समस्या निर्माण झाल्या. शेतकऱ्याकडे पैसा उरला नाही. त्याला जगणे मुश्कील झाले. प्रसंगी तो आत्महत्या करीत आहे. पण शहरातील भांडवलदार, भ्रष्ट राजकारणी, भ्रष्ट शासकीय अधिकारी, श्रीमंत वर्ग सामान्य शेतकऱ्यांकडून शेती विकत घेतो आहे व शेतकऱ्यास देशोधडीला लावत आहे याचेही चित्रण ग्रामीण कादंबरीत समर्थपणे येत आहे. एकूण इ.स. 1980 नंतरचे ग्रामीण कादंबरीकार बहुरंगी ग्रामीण अनुभवविश्व मोठ्या सामर्थ्यानिशी अभिव्यक्त करीत आहेत. हेच स्पष्ट होते.

### *संदर्भ*

1) सूर्यवंशी नानासाहेब, 'ग्रामीण साहित्य : मूल्य आणि अभिरूची', पद्मगंधा प्रकाशन, पुणे 2015, पृ. 38–39.
2) कोत्तापल्ले नागनाथ, 'साहित्याचा अवकाश', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती–2013, पृ. 293
3) मोहिते गणेश, 'समकालीन मराठी कादंबरी', 'जनशक्ती वाचक चळवळ', औरंगाबाद, प्रथमावृत्ती–2013, पृ. 46–47.

Publish Research Article
International Level Multidisciplinary Research Journal
For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org